<?xml version="1.0" ?>			
<?xml-stylesheet type="text/css" href="home.css"?>			
<Doc id="mar-w-media-	MA00003	"	lang="Marathi">
<Header type="text">			
<encodingDesc>			
<projectDesc>	CIIL-Multilingual parallel text corpora		</projectDesc>
<samplingDesc>	Simple written text only has been transcribed. Diagrams, pictures, tables and verses have been omitted. Samples taken from page 42, 82, 122, 162, 202, 242, 282, 322, 362, 402		</samplingDesc>
</encodingDesc>			
<sourceDesc> <biblStruct> <source>			
	<category>	Aesthetics	</category>
	<subcategory>	Literature-Novels	</subcategory>
	<text>	Book	</text>
	<title>	tistEkAThacA vritAMta	</title>
	<vol>		</vol>
	<issue>		</issue>
</source>			
<textDes>			
	<type>		</type>
	<headline>		</headline>
	<author>	dEvEsha rAya	</author>
	<translator>	vilAsa gItE	</translator>
	<words>	2625	</words>
</textDes>			
<imprint>			
	<pubPlace>	India-New Delhi	</pubPlace>
	<publisher>	sAhitya akAdamI	</publisher>
	<pubDate>	1998	</pubDate>
</imprint>			
<idno type="CIIL code">		87085	</idno>
<index>		MA00003	</index>
</biblStruct> </sourceDesc>			
<profileDesc> <creation>			
	<date>	17-Aug-2009	</date>
	<inputter>	H.S.Rupa	</inputter>
	<proof>	Supriya Shetty	</proof>
</creation>			
<langUsage>		Marathi	</langUsage>
<wsdUsage>			
<writingSystem id="ISO/IEC 10646">Universal Multiple-Octet Coded Character Set (UCS). </writingSystem>			
</wsdUsage>			
<textClass>			
<channel mode="w">		print	</channel>
<domain type="public">			</domain>
</textClass>			

</profileDesc> </Header>		
<text><body>		
<p>	उतरल्या-उतरल्या तर काही तो माणूस मान सरळ करून त्याच्याकडे पाहू शकत नाही. त्याला मान सरळ करण्यासाठी थोडा वेळ लागतो. मान सरळ करून तो अंधारात हुजूरांना शोधतो - इकडे-तिकडे, या कोपऱ्यात-त्या कोपऱ्यात, त्यानंतर एका दिशेने सरळ काही पावलं जाऊन, उभा राहून तो म्हणतो, 'हुजूर, मी आलोय्. मी फॉरेस्टरचन्द्र बाघारूबर्मन.'	</p>
<p>	फॉरेस्टर आपले दोन हात जोडू पहातो. पण कुठल्याही उपायांनी ते जमत नाही. दोन हातांच्या जणू दोन अलग गती, अलग भार. डावा हात वर उठतो, पण उजवा हात उठतच नाही. डावा हात नमस्काराच्या भंगिमेत बराच वर उचलून फॉरेस्टर डोळे आकुंचित करून पहातो, त्याचा उजवा हात नाही, डोळे आणखी बारीक करून, जणू तो पहातो - आपला उजवा हात गेला कुठं? नंतर उजव्या हाताला डाव्या हाताजवळ आणण्यासाठी प्रयत्न करीत रहातो. हळू-हळू उजवा हात वर येतो. इकडं डावा हात पुन्हा खाली जातो. तो तेव्हा दोन्ही हातानां स्थिर करून एकदा डाव्या, तर एकदा उजव्या हाताकडे पहातो. या प्रकारे दोनेकवेळा पाहिल्यानंतर तो अचानक दोन्ही हातांना नमस्काराच्या ठिकाणी ओढून आणतो. कसेबसे दोन्ही हात जुळल्यावर फॉरेस्टर त्या जोडलेल्या हातांकडे पाहून खूप हसतो, जणू दोन्ही हातांचा गोंधळ थांबवून त्यान त्या हातांना आपल्या ताब्यात आणलंय्.	</p>
<p>	मनातल्या मनात हसत, डोक्यापर्यंत पहात फॉरेस्टर 'अरे वा!' म्हणतो, पुन्हा हसतो.	</p>
<p>	आता जोडलेले हात डोक्यापर्यंत वर न उचलता तो डोकंच हातांवर वाकवतो. डोकं सरळ हातांवर वाकत नाही - एका बाजूला झुकू पहातं. पण फॉरेस्टर ते झुकू देत नाही. तो हळूहळू डोकं जोडलेल्या हातांकडे नेऊ पहातो. दोन्ही हात कसेबसे जुळवले आहेत असं वाटतं - बोटं झुलतांहेत, मनगटं वरच्या बाजूला. फॉरेस्टर मनगटांवर कपाळ टेकवतो. त्यानंतर हात जोडलेलेच ठेवून तो डोकं सरळ करतो. हळू-हळू सरळ करता-करता अचानक सरळ करतो - जणू मान फिट झाल्यावर 'खट्' असा आवाजही येतो. त्यानंतर फॉरेस्टर बोलू लागतो - 'हुऽजूऽर, मी फॉरेस्टरचन्द्र आलोय्.' एवढं बोलल्याबरोबर त्याची नजर आपल्या जोडलेल्या हातांवर पडते. तेव्हा, जणू फाडून वेगळे करावेत, तसे फॉरेस्टर आपले दोन हात अलग करतो, संरळ उभा रहातो. पुन्हा हसून म्हणतो, 'हुजूर, मी आलोय्. मी फॉरेस्टरचन्द्र. फॉरेस्टरचन्द्र बाघारूबर्मन. पाहून घ्या. माझा चेहरा, माझं शरीर, पाहून घ्या. टॉर्च लावा, किंवा माचिसची काडी पेटवा. पाहून घ्या. वन्-टू-थिरी-'	</p>
<p>	गयानाथच तेवढा विश्रांती घेऊ शकत नाही. तो भुवयांवर एकदा उजवा, तर एकदा डावा हात ठेवून कुठल्यातरी एका बिंदूवर त्या दोघांना शोधण्याचा प्रयत्न करतोय. गयानाथने जर एकच हात आपल्या भुवयांवर धरला असता, तर तो इतका बेचैन वाटला नसता. पण एकदा डावा, तर एकदा उजवा हात वर करण्याने आणि खाली करण्याने वाटतं, की जणू तो तिस्तेच्या संपूर्ण विस्तारावर नजर ठेवतोय. आणि, इतक्या वेगाने वहाणाऱ्या विस्तीर्ण प्रवाहाकडे इतका वेळ एकटक पहात राहिल्याने वाटतं, की जणू किनाराच जहाजाप्रमाणे तरंगत चाललाय, आणि गयानाथ डेकवर उभा राहून समुद्रातल्या दूरवरच्या बेटावर कुणालातरी शोधतोय.	</p>
<p>	सगळे गप्प झाले होते, बहुधा अचेतनही. आणि फॉरेस्टच्या इतक्या आतमध्ये, नदीच्या	</p>

	इतक्या किनाऱ्याशी शांत राहिल्याने ही जागा तिच्या स्वाभाविक स्तब्धतेकडे परत येते. त्या स्तब्धतेत फक्त इतक्या माणसांच्या निःश्वासांचा आवाज तेवढा मिसळतो. त्या शांतपणात तिस्तेवरून वारा येतो, आणि झाडापेडांमधून दाट वनात जातांना जणू शालवृक्षांनाही उपटू पहातो.	
<p>	'परत यायला निघालेत', 'कुणीतरी खूप दबल्या आवाजात म्हणतं. हे वाक्य अशा प्रकारे उच्चारलेलं असतं, की जणू सर्वांनी त्यावर विश्वास ठेवावा. त्यानंतर शांततेतच नजरेने त्या दोघांचा शोध घेणं चालतं. सुहासही बारीक नजरेने पहातो. पण कुठल्या बाजूला पहावं हे त्याला समजत नाही. फक्त या धूसर सपाट भागावर एखादा काळा बिंदू दिसल्यावरच ते लोक इकडे येताहेत हे सुहासला समजेल.	</p>
<p>	'हे काय, हे काय, येताहेत-' सुहास बघतो, सगळेच त्याच्या डावीकडे बोटे दाखवताहत. पहात राहुनही त्याला काही दिसत नाही. प्रवाहाविरुद्ध त्या दोघांना किती अंतर पोहावं लागणार?	</p>
<p>	सुहासजवळून गयानाथ म्हणतो, 'हं ऽ, आता ते मौवामारीच्या सीमेत घुसले, ना?' सुहास म्हणतो, 'आँ?'	</p>
<p>	तेव्हा गयानाथ सुहासला विचारतो, 'ते येताहेत हे दिसतंय ना?'	</p>
<p>	'कुठंयत?'	</p>
<p>	'हे काय डाव्या हाताला', 'गयानाथ आपला उजवा हात दाखवीत म्हणतो', 'आता डाव्या बाजूला हळूहळू मान वळवा, हं, पुरे, पहा!' गयानाथ सुहासला वेळ देतो. मग विचारतो, 'दिसले का?'	</p>
<p>	सुहास मोघमपणे म्हणतो, 'हो-'	</p>
<p>	हेच का फॉरेस्टरचन्द्र बाघारू-बर्मनचं फॉरेस्ट? यातलं तर तो काहीच ओळखू शकत नाहीय. आपण कधीकाळी या फॉरेस्टमध्ये होतो हे सुद्धा त्याला जणू आठवत नाहीय. तरीही त्याचे डोळे बांधून सोडलं, तर बाघारू कुठल्याशी झाडाला टक्कर न देता या जंगलातून फिरू शकेल. आता जीपच्या मागच्या भागात बसून जंगलाकडे पहाताना, आपण कुठून कुठे चाललो आहोत हेच त्याच्या लक्षात येत नाही.	</p>
<p>	जीपमधून हे फॉरेस्ट अनोळखी वाटतं. असिन्दिरच्या फटफटीवर मागे बसवलं, तर असं अनोळखी वाटत नाही. हे फॉरेस्ट तेव्हा तर सगळं समोर असतं. म्हणूनच, गाडी थांबल्यावर आधी फागू उडी मारून आणि नंतर आमदार आपली ब्रीफकेस घेऊन उतल्यावरही बाघारू उतरू शकत नाही. हे दोघे उतरल्यावर आपणही उतरायला हवं, हा बोधच बाघारूला गाडीच्या वेगामुळे होत नाही. इतक्या तातडीने नदीपर्यंत पोचता येतं? हे जणू फॉरेस्टला ओढून फूलबाडी वस्तीजवळच्या नदीकाठी ओढून आणल्यासारखं वाटतं - नदीकाठच्या ओळखीच्या जंगलामुळे बाघारू आश्वस्त होऊ शकला असता - ते जंगलही जीपच्या अढथळ्यामुळें दिसत नाहीय.	</p>
<p>	बहादूर अचानक गियर बदलून जीप मागे घेतो. तेव्हा फॉरेस्ट बाघारूच्या समोर, संपूर्ण दिसलं नाही, तरी समोर तोच फॉरेस्टमध्ये शिरतोय - फॉरेस्ट स्थिरच आहे - अशी नेहमीची जाणीव त्याला पुन्हा होऊ लागते.	</p>
<p>	पण पुढच्याच क्षणी आणखी एका धक्क्यात बहादुर गाडी पुढे नेतो. बाघारू ठेच लागून पडतो. गाडी मागच्या दिशेने वळवून, आनंदपूरकडे जाण्यासाठी उभी करून, बहादुर मान न	</p>

	वळवताच म्हणतो, ‘उतरो!’	
<p>	तेव्हा, बाघारूपासून थोड्या अंतरावर, हातात ब्रीफकेस घेतलेला आमदार आणि फागू उभे. गाडी वळून उभी राहिल्याबरोबर फागू धावत येऊन समोरच्या सीटवर बसतो, तरीही बाघारूचा जीपमधून उतरण्याचा कार्यक्रम संपलेला नसतो. बहादुरचा आवाज आल्याबरोबर तो उभा राहिला होता. डोक्याला टक्कर लागून खाली बसलाय. त्यानंतर सरपटत-सरपटत या मागच्या झापडीपाशी येऊन एक पाय बाहेर काढतो. पण ते पाय जमिनीवर ठेवायच्या आतच जीप हूऽश करून पुढे जाते. फागू मागे वळून ‘लाल सलाम!’ म्हणून इकड-तिकडे मान वळवतो, पण त्याला आमदार दिसत नाही. तेव्हा रस्ता झाकून बाघारू उभा असतो. मागच्या बाजूने आमदार म्हणतात, ‘चला भाऊ, चटकन नदी पार करवून द्या.’	</p>
<p>	इंजिनिअरला थांबवून आमदार अचानक चित्कारतो, ‘शेड्युल सीटच्या आमदाराचं ऐकणं ही तुम्हाला आपल्या प्रेस्टिजपेक्षा खालची गोष्ट वाटते, नाही का?’	</p>
<p>	मणी अचानक दचकुन म्हणतो, ‘हे काय म्हणताय् वीरेनदा?’ आमदार मणीला म्हणतो, ‘आपण चूप बसा, आपणाला हे समजणार नाही. आपणाशी तर काही हे लोक असं वागत नाहीत. आपण इंग्रजीत सांगा. आमदार झालो नसतो तर मलाही हे समजलं नसतं. नाहीतर मालबाजारचा साधा एक असिस्टंट इंजिनिअर, माझं पत्र आधी मिळून सुद्धा तिथं हजर न रहाण्याची हिम्मत कशी दाखवू शकतो? याला जर जलपाइगुडी किंवा धूपगुडीच्या आमदाराने पत्र लिहिलं असतं, तर याने दहा वेळा तिथं जाऊन ‘सर’, ‘सर’ केलं असतं, तर होऊ द्या ना, विचार होऊ द्या. जाऊ द्या मिक्स्चर टेस्ट होण्यासाठी. पण त्यात जर दोष निघाला, तर एका गरीब ठेकेदारावर आणि एका शेड्युल-कास्ट मंडलवर त्याचा दोष थापणं चालणार नाही. ती जबाबदारी इंजिनियरांनी घ्यायला हवी.’	</p>
<p>	याला उत्तर म्हणून इंजिनियर काही बोलू पहातो, पण मणी हात वर करून त्याला थांबवतो. मणी उभाच आसतो. वीरेनने गप्प रहावं या एकाच कारणासाठी तो उभा राहिलेला आहे. मणीने इंजिनियरला थांबवलेलं पाहून आमदार पुन्हा बोलू लागतो, ‘त्यांना कशाला थांबवता, बोलू द्या ना, आता नवीन काय बोलणार? त्यांनी पाहिलं, ते सगळं टेस्ट बिस्ट म्हटल्यावरही आम्ही घाबरून गेलो नाही; साले त्या ठेकेदाराच्या माणसाकरवी म्हणू बघताहेत की फुलबाडीचे लोकच चोर आहेत म्हणून!’	</p>
<p>	फुलबाडांची माणसं एका सुरात ओरडतात, ‘नाव सांगा, नाव सांगा-आम्ही त्याला बोलावून आणतो. फुलबाडीच्या गटातली दोनतीन माणसं उभी राहून इंजिनियर लोकांवर ओरडू लागतात. मणी त्यांच्या दिशेने हात करून म्हणतो, ‘बसा, बसून घ्या.’	</p>
<p>	आमदाराचा राग त्याच वेळी पराकोटीचा वाढतो, ‘काय करणार? ठेकेदारांची चोरी धरली तर आपणाला चोर म्हणणार, इंजिनियरांचा कामचुकारपणा पकडलात, तर आपणाला ठक बनवणार, कायद्याने चालायचं ठरवल्यावर आपणाला बेकायदेशीर वागणारे म्हणतात, उद्याच जाऊन वर्तमानपत्रं रेडिओवर प्रचार करणार-पुन्हा डूयार्स-मध्ये लोकन्यायालन-इंजिनियरांचा विचार?’	</p>
<p>	मणी खाली वळून खूप झटकन काहीतरी म्हणतो, त्यानंतर सरळ उभा राहून ओरडतो, ‘ऐका, आपण बसला नाहीत तर ही मीटींग इथेच संपवून टाकीन. बसा, बसा!’	</p>
<p>	या धमकीने फुलबडीचे लोक बसल्याबरोबर मणी मोठ्या आवाजात सुरुवात करतो, ‘हे पहा,	</p>

	दंगा-हंगामा सुरू व्हावा असं इथं काहीही घडलेलं नाहीय्. इथल्या इंजिनियरांच्या वर्तणुकीमुळे आपले आमदार खूप दुःखी झालेले आहेत.'	
<p>	जुन्या जोतदारीच्या नवीन शेतीप्रमाणे, बाथानदारी (जनावरांचे गोठे बाळगणे) सुद्धा नव्याने सुरू झाली आहे.	</p>
<p>	जलपाइगुडी, डूअर्स आणि दार्जिलिंग पहाडांच्या पायथ्याशी असलेल्या अनेक गावांच्या नांवांमध्ये 'बाथान' (गोठा) हा शब्द आहे. 'गरुबाथान', 'महिषबाथान' ही तर अगदी चांगल्या ओळखीची नांवं. ही नांवं अशी पडली याबद्दल काही गोष्टी आहेत. या सगळ्या गावांची वस्ती अगदी अलीकडची आहे. त्यामुळे या गोष्टींमध्ये बहुधा आजवरचा इतिहासच आहे.	</p>
<p>	पण इथलं हे गोठे - गोठे भरून गायीम्हशी पाळणं मुश्किलीने वीस-पंचवीस वर्षापासून सुरू झालंय. अगदी काटेकोर हिशेब केला, तर पंधरा वर्षांपूर्वीपासूनही म्हणता येईल.	</p>
<p>	१९६२ मध्ये चीन-भारत युद्ध सुरू झालं, तेव्हा सकाळ-संध्याकाळच्या बातम्यांत वेगवेगळ्या गावांची नांवं सोडता डूअर्सच्या लोकांना युद्ध काहीच समजलं नाही. हायवेजवळ रहाणाऱ्यांनां सतत मिलिटरीच्या गाड्या ये-जा करताना दिसत. पण सगळ्यांनाच काही ते दिसू शकलं नाही. तेही भारतातील इतर नागरिकांप्रमाणेच रेडिओवर बातम्या ऐकत, वाचू शकणारे पेपरमध्ये वाचत. ते युद्ध तर काही महिन्यांनी थांबलंसुद्धा.	</p>
<p>	युद्धसंपल्यावर सगळ्या डूअर्समध्ये नाना घटना घडू लागल्या - वर्षामागून वर्ष. अरूंद रस्ते रूंद झाले. लाकडी साकव काढून टाकण्यात आले. छोट्या-छोट्या नद्यांवर पक्के पूल झाले. जलपाइगुडीवर तिस्तेचा ब्रिज झाला. आता शिभक ब्रिजवरून हेलपाटा घ्यावा लागत नाही. आणि, शिलिगुडीच्या उत्तरेला दार्जिलिंग पहाडाच्या पायथ्यापासून आसामपर्यंत, हायवेच्या दोन्ही बाजूना, वनातलं जंगल साफ करून, मिलिटरी कॅम्प उभारण्यात आला. त्या कॅम्पला जणू अंतच नाही. जंगलाचा अंतर्भाग साफ करून पक्की घरं, पक्के रस्ते झाले. अगणित घरं आणि त्यांत अगणित माणसं. फॉरेस्टमधली मोठी-मोठी झाडं तशीच ठेवण्यात आली, त्यांच्या पायथ्याची बाजू साफ करण्यात आली.	</p>
<p>	फक्त जंगलातच नव्हे, कुठे-कुठे मिलिटरीने शहरांबाहेर नवीन शहरं वसवली. ती सारी शहरं कुठं भिंतींची, तर कुठे काटेरी तारेची कुंपणं आहेत. कधीकधी त्या जागांवर विमानं उतरतात.	</p>
<p>	१९५२ आणि १९५४ सालच्या पुरानंतर चरांवर वस्ती केलेले नमशूद्र पुन्हा चरांवरच आले होते. १९६८ च्या पुरानंतरही, पुन्हा या चरांवरच वस्तीसाठी येण्याव्यतिरिक्त या लोकांसमोर दुसरा मार्ग नव्हता. कारण तोपर्यंत, दोन दशकांमध्ये मउवामरीपासून काशियाबाडीपर्यंतच्या तिस्तेच्या चरांवर वस्ती झाली होती. शेतकऱ्याच्या सहकारी संस्थाही स्थापन झाल्या होत्या, आणि शेतकरी लोकांनी सुरू केलेल्या स्वतंत्र उद्योगांमुळे, भाजीपाल्याच्या उत्पादनामुळे जिल्ह्याच्या अर्थनीतीचा चेहरामोहरा बदलला होता. १९६८ च्या पुराच्या वेळी चरांवरचे शेतकरी हे जलपाइडीच्या लोकवस्तीचे मुख्य भाग बनले होते, आणि चरांवरचं पीक आर्थिक जीवनाचा अपरिहार्य भाग बनलं होतं. म्हणूनच, १९६८ च्या पुरानंतर शेतकऱ्यांना चरांवर परत येणं भागच होतं.	</p>
<p>	पुरामुळे तिस्तेचा भूखंड बदलून गेला होता. या बदललेल्या भूखंडावर त्यांनीही काही बदल स्वीकारून पुन्हा वस्ती केली. तिस्ता जशी स्वतःला बदलते, तसंच त्यांनीही स्वतःला	</p>

	बदलवून घेतलंय. पण, १९६८ च्या पुरातही तिस्तेमधून ज्यांचा उच्छेद झाला नाही, त्याचा आता उच्छेद होणार नाही. १९६८ च्या पुरानेच जणू तिस्तेच्या चरांना आणि त्या चरांवरील शेतकऱ्यांना इथल्या मुख्य भूभागाचा अंश बनवून टाकलंय.	
<p>	फाळणी झाल्यानंतर पूर्वबंगालमधून आलेले निर्वासित नमशूद्र शेतकरी व उत्तर बंगालमधील पहाडी लोक यांनी तिस्ता नदीला एकप्रकारे जिंकून घेतलं. भूगोलावर इतिहासाने जय मिळवला.	</p>
<p>	त्यानंतर, त्या सगळ्या उंच किनाऱ्यांवर बांधलेल्या गुरांना घेऊन हे तिघेही एकाच वेळी पाण्यात उतरतात, आणि जिथं भादईने बांबू बांधून ठेवले होते, त्या दिशेने येऊ लागतात. तिघेही डोक्यांवर छडीसारखं काहीतरी फिरवीत, गरज नसतानाही जिभेने टर्रर, टर्रर, आवाज काढीत गुरांना घेऊन निघतात. त्या आवाजांमुळे म्हणा, की पाण्यापलीकडे दिसणाऱ्या जमिनीच्या ओढीमुळे म्हणा, शक्य तितक्या वेगाने गुरं बांधाच्या दिशेने धावू लागतात.	</p>
<p>	त्या पळण्यात एकच गैरसोय होती. पाण्याची खोली ठिकठिकाणी वेगवेगळी होती. कुठं गुरांच्या छातीपर्यंत पाणी होतं, कुठं कुणी-कुणी वासरं बुडुन जात होती, कुठं वासरांना पाणी आणि जमीन यांच्यामधला फरक कळत नव्हता, आणि क्षणात पाण्यावर दिसणारी वासरं लगेच पाठीइतक्या पाण्यात बुडून जात होती. आता एकही जनावर हंबरत नाहीय, जणू, आपल्या हंबरण्यामुळे आकाशातल्या, दूर पहाडांवरच्या पोकळ्यांत साठलेल्या पाण्याला आपला पत्ता लागेल असं जनावरांना वाटत होतं. शक्य तितक्या घाई नेती नदी पार करीत होती.	</p>
<p>	पण इतकी गुरं नेहमेपेक्षा अधिक पाण्यातून नदीपार करण्यासाठी भादई, कांदुरा आणि कानकाटू यांना जरा अधिक साहसाची गरज वाटते. आकाश नदीवर इतकं ओथंबलंय, की काही वेळाने दोघांमध्ये काहीच अंतर रहाणार नाही असं त्यांना वाटतं. अद्याप आकाश नदी यांच्यात थोडं अंतर आहे हे स्वतःलाच समजावण्यासाठी भादई हुंकार देतो- 'एऽ, हेऽट, हेट; खबरदाऽऽऽर! खबरदाऽर!' कान्दुरा ओरडतो, 'कानकाटू, डावीकडं मार, डावीकडं!'	</p>
<p>	भादईने पाण्याखाली गेलेल्या ताठावर जिथं बांबू बांधले होते, तिथे गेल्यावर गुरं क्षणार्धात त्या दोन बांबूंच्या लाइनमध्ये घुसतात, पुढे जाऊ लागतात. भादई, कांदुरा आणि कानकाटू त्या दोन बांबूच्या लाईनमध्येच वेगवेगळ्या ठिकाणी उभे रहातात. ढगाळ आकाशातही एक अदृश्य सूर्यास्त होतो. त्या प्रचंड पाण्यातून, कांदुरा, भादई आणि कानकाटू आपलं घेनुदल घेऊन, या संध्याकाळी पैलतिरी पोचतात-	</p>
<p>	ही झांड म्हणजे जणू नावा आहेत, आणि आपल्या कुणा प्रियतम व्यक्तिला गायानाथ त्या नावेत बसवून सोडणार आहे. या नावा पुरात कुठं जाऊन किनाऱ्याला टेकतील? पुराने सगळेच किनारे ध्वस्त केले, तर गयानाथ ही झाडं शोधणार कशी? सापडली नाहीत, तर किती हजारांचं नुकसान होईल? जणू हे पैसे गयानाथ कनवटीचे काढून पाण्यात सोडणार होता! ही चार-चार झाडं पराच्या या रात्री पत्याला तितकीच जवळची वाटू लागली आहेत.	</p>
<p>	'मउवामारीच्या चरावर गुराखी, प्रेमगंज चरावर भटिया, तर बाकालीच्या चरावर मुसलमान आहेत. काशियाबाडीच चर पार करून ही झाडं पाकिस्तानात तर जाणार नाहीत?'	</p>
<p>	वाऱ्याच्या आवाजात गयानाथचा हाहाःकार मिसळून जातो. गयानाथ पुन्हा चीत्कारतो, 'ए बाघारू!'	</p>

<p>	बाघारू समोर असूनही उत्तर देत नाही. तो तर समोरच उभा आहे. तोंड थोडं नदीकडे, थोडं गयानाथकडे करून. तो जरा आणखी गयानाथकडे वळतो. त्याच्या हातांना झाडांना बांधलेल्या दोरीची ओढ बसते. पुरात वाहून नेण्यासाठी प्रवाह झाडांना ओढतोय्.	</p>
<p>	‘बाघारू, तू जा बरं या झाडांबरोबर! एवढी मौल्यवान झाडं, प्रवाहात कुठंतरी भरकटत जातील अन् कुणाच्यातरी हाती पडतील! तू पण वहात जा झाडांबरोबर, त्यांच्यावर पहारा देत!’	</p>
<p>	गयानाथाच्या चीत्कारानंतरच्या शांततेत वारा उन्मळून पडलेल्या झाडांच्या फांद्यांना झोडपतो आणि प्रवाहाची ओढ बाघारूच्या पंजाला, मनगटाला, गुडघ्यांना जाणवते - प्रचंड ओढ. कुऱ्हाड जमिनीवर टाकून बाघारू नरम मातीत झाडं ओढून ठेवतो.	</p>
<p>	‘बाघारू, झाडांबरोबर वहात जा. ती जिथं टेकतील, तिथं थांब. आम्ही झाडांना आणि तुला शोधून काढू.’	</p>
<p>	बाघारू आपल्या हातातली दोरी हळू-हळू सोडतो. हे जाणवल्याबरोबर प्रवाह जणू चारी झाडांना वाहून नेऊ पहातो. आणखी थोडी दोरी सोडून बाघारू त्या झाडाच्या खोडाजवळ जातो. त्या खोडावर गुडघा टेकून, दोरी आणखी ओढून, सर्व शक्तीनिशी खोडाभोवती दोरीचे दोन-तीन पेच देतो. झाडं आता अगदी किनाऱ्याशी आली आहेत. मोकळ्या हातांनी बाघारू उभा रहातो, कुऱ्हाड मागे लंगोटीत खोचतो. किनाऱ्याशी उभा राहून त्या झाडांपैकी एका झाडाची मजबूत फांदी शोधतो. तशी फांदी त्याला सापडते. पक्षी फांदीवर पाय ठेवतात, त्याप्रमाणे त्या फांदीवर हात ठेवून बाघारू पुरात झेप घेतो. वाहात जाणाऱ्या झाडाचा शेंडा वाऱ्याने थरथरतो.	</p>
<p>	“गयानाथ जोतदार, गाजोलडोबा” एवढं लिहिलंय्. आता तुमचं नांव तेवढं सांगा.	</p>
<p>	बाघारू नीट उत्तर देत नाही असं पाहून ऑफिसर म्हणतो, ‘नसेल सांगत तर सोडून द्या.’ जणू, गाजोलडोबाहून एक माणूस झांडासहित वाहात आला, त्याला वाचवण्यात आलं - एवढं ऑफिसरच्या रिपोर्टसाठी पुरेसं आहे. पुरात एवढं अंतर वाहात येता-येता माणसाला इतका मानसिक धक्का बसू शकतो, की त्याला आपलं नांवही आठवणं अशक्य होतं!	</p>
<p>	थोड्या वेळाने नरेश म्हणतो, ‘आपलं नांव सांगा!’	</p>
<p>	‘मला नांव नाही हो!’ नरेश आता रागावतो, ‘नाव नाही सांगता येत तुम्हाला स्वतःचं? हे घोंगडं, कपडे ताडपत्री, खाणं - हे कुणाच्या नावावर द्यायचं मग तुम्हला?’ की त्याचीही गरज नाही तुम्हाला?’	</p>
<p>	बाघारू या जिनसांच्या लोभाने तरी नांव सांगेल असं नरेशला वाटतं, पण बाघारू म्हणतो, ‘गयानाथचं नाव लिहा!’	</p>
<p>	‘अरे? परत गयानाथ? मदत तुम्हाला द्यायची अन नांव गयानाथचं?’	</p>
<p>	‘मला गरज नाही.’	</p>
<p>	ऑफिसर तेवढ्या वेळात ‘गयानाथ जोतदाराच्या शेतजमिनीवर काम करणारा एक शेतमजूर’ असं लिहून टाकतो; ड्रायव्हरला म्हणतो, ‘चला!’ नरेशला म्हणतो, ‘सोडून द्या त्याला! उद्या ऑफिसला याल तुम्ही, तोवर समजलं तर पहा!’	</p>
<p>	पहात आपल्या खालच्या आवजात म्हणतात, ‘हे पहा, परवा सकाळी मीटिंग, मंत्री असतील, मीटिंगमध्ये ते नक्कीच निर्दिष्ट प्रस्ताव मांडतील, तुम्हला त्या प्रस्तावाच्या उत्तरात निर्दिष्ट गोष्टी बोलाव्या लागतील, हो किंवा नाही, किंवा निर्दिष्ट प्रस्थाव मांडावा लागेल.	</p>

	तुम्हाला तुमची सर्वांची मीटिंग घेऊन एक लेखी निर्णय घ्यावा लागेल, की या मंडपात उत्तरखंड मेळावा घेऊ देण्यास जर सरकारने हरकत घेतली, तर श्रीदेवीचा कार्यक्रम, म्हणजेच कल्चरल फंक्शन, होणार की नाही. एकेकाजणाने एकेक मत मांडून चालणार नाही. या मीटिंगमध्येही एकेकजणाने एकेका प्रकारे बोललेलं चालणार नाही आता एक लिस्ट करून ज्यांना ज्यांना कळवता येईल, त्यांना खबर द्या.’	
<p>	नकुल नवीनला म्हणतो, ‘ए, लिस्ट तयार कर, नवीन!’	</p>
<p>	नवीन वीरेनबाबूंना म्हणतो, ‘काका, आम्ही जर त्या मीटिंगला गेलो नाही तर काय होईल?’	</p>
<p>	वीरेनबाबू चेहेरे वर करून नवीनला पहातात जणू त्यांना विचारायचंय, की हा पर्याय कितपत व्यवहार्य आहे?’	</p>
<p>	नवीन पुढे म्हणतो, ‘काय करावं? पोलीस येऊन उत्तरखंड मेळाव्याला आडकाठी आणणार आणि श्रीदेवीला सोडून देणार - असं झालं तर कसं काय करणार? त्यांनी प्रस्ताव केला, तर करोत, आम्ही गिरफ्तार होऊ.’	</p>
<p>	वीरेनबाबू अचानक उठून उभे राहिले, ‘तर तुम्ही लिस्ट तयार करून खबर द्या. आणि त्यांनाही मीटिंगला यायला सांगा,’ हे ते नकुललाच म्हणाले, ‘तुम्ही रात्री माझ्या घरी या. काय झालं ते ऐकेन.’ नकुल जवळच येरझारा घालतो, बाकीचे त्याच्या मागे-मागे. वीरेनबाबू अचानक थांबून नकुलला म्हणतात, ‘हे बघ नकुल, “उत्तरखंड मेळाव्यातील शेवटच्या दिवशीची जल्पेश्वर मोहीम वेगवेगळ्या ठिकाणी घेतली जावी” असं तुम्हा तेरा पार्टनर्सपैकी कुणीही म्हटलेलं योग्य होणार नाही.’	</p>
<p>	नकुल थोडावेळ गप्प रहातो, जणू तो वीरेनबाबूंना कल्पना देऊ पहातोय की असा विचार काहीजण करूही शकतात. पण नीरवतेचा भंग करून तो म्हणतो, ‘ते आधी झालं असतं तर विचार करता आला असता, ठाण्याच्या मीटिंगमध्ये झालं असतं तर काहीतरी झालं असतं. पण आता झालं तर वाटेल की सरकार बळ वापरून उत्तरखंडाला शिक्षा देतंय् आणी आम्ही त्यांना संधी उपलब्ध करून दिली. सगळेजण सगळ्या ठिकाणी एकाच वेळी काम करताहेत, कोणतं उत्तरखंड आणि कोण श्रीदेवी हे कोण ठरवणार? आणि तसं झालं तर काय करणार काका, आता ते होणार नाही.’	</p>

</body></text>
</Doc>